# मुद्दा क्रं. ४. कार्यालयातील काम करताना वापरात येणारी मानके प्रमाणके

| आस्थापना -अ |
|---|
| • शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी १०९७/प्र.क्र. ६३/९७/१६-ब, दि. १८.१०.१९९७ व तद्अनुषंगीक शासन निर्णयानूसार आरक्षण कार्यान्वयीत करणे<br>• शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही १०९७/ प्र.क्र.२०/९७/बारा, दिनांक २७.११.१९९७ अन्वये बदल्यांबाबत कार्यवाही  करणे<br>• सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, दि. २९.०१.२००४, शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र. ईएसबी-११०३/प्र.क्र.४३/२००३/१३, दि. १६ जुलै, २००३ अन्वये विहित केलेली तपासणीसूची व शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र. ईएसबी-११०४/प्र.क्र.८/०४/१३, दि. १५ मे, २००४ अन्वये विहित केल्यानूसार पदोन्नतीबाबत कार्यवाही करणे<br>• शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही १०९७/प्र.क्र.३/९७, १६-ब, दि. १६ मार्च, १९९९ नुसार सामाजिक आरक्षणाव्यतीरिक्त महिला व अपंगासाठी आरक्षण कार्यन्वयीत करणे.<br>• शासन निर्णय क्र. बीसीसी १०९७/सीआर-५७/९४/१६-ब, दि. ५ डिसेंबर, १९९४ अन्वये मागासवर्गीयांसाठी आरक्षीत पदांवर उमेदवार उपलब्ध न झाल्यास अदलाबदलीने पदभरती व पदे आरक्षणातून मुक्त करण्याची कार्यवाही करणे<br>• शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक अरजा-२४९३/५९/सेवा-९, दिनांक १६.७.१९९४ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानूसार रजा मंजूरीचीं प्रकरणे हाताळणे.<br>• शा. परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र. अपंग-१००३/प्र.क्र. १२७/२००३/१६ अ दि. ६/५/२००४ अनुसार अपंगासाठी आरक्षणाची नोंदवही कार्यान्वयीत करणे<br>• महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ नुसार रजा प्रकरणे हाताळणे<br>• महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण अटी) १९८१ नुसार आस्थापनाविषय प्रकरणे हाताळणे<br>• महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) व (वर्तणूक) १९७९ अनुसार तक्रारीची प्रकरणे हाताळणे<br>• महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी व स्वीयेत्तर सेवा) १९८१ नुसार पदग्रहण  अवधीची प्रकरणे हाताळणे |

**आस्थापना १ : (शासकीय संस्था )**

- शासकीय अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये/ तंत्रनिकेतने व तत्सम संस्थातील वर्ग १ व २ अधिकाऱ्यांचे प्राप्त झालेले बदली अर्जावर कार्यवाही करणे.
- शासकीय अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये/ तंत्रनिकेतने व तत्सम संस्थातील संस्थातील वर्ग १ व अधिकाऱ्यांची व गंथपालाची वरिष्ठ श्रेणी / निवड श्रेणी प्रकरणावर कार्यवाही करणे
- शासकीय अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये/ तंत्रनिकेतने व तत्सम संस्थातील संस्थातील वर्ग १ व २ अधिकाऱ्यांची रजा मंजूरीची प्रकरणावर कार्यवाही करणे.
- शासकीय अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये/ तंत्रनिकेतने व तत्सम संस्थातील संस्थातील वर्ग १ व २ अधिकाऱ्यांची रजा मंजूरीची प्रकरणे हाताळणे.
- शासकीय अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये/ तंत्रनिकेतने व तत्सम संस्थातील संस्थातील वर्ग १ व २ अधिकाऱ्यांची राजीनामा प्रकरणावर कार्यवाही करणे.
- शासकीय अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये/ तंत्रनिकेतने व तत्सम संस्थातील वर्ग १ व २ अधिकाऱ्यांची पारपत्रासाठी नाहरकत प्रमाणपत्रे मिळण्याची प्रकरणावर कार्यवाही करणे.
- स्वग्राम सवलतीबाबत शासकीय अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये/ तंत्रनिकेतने व तत्सम संस्थातील वर्ग १ व २ अधिकाऱ्यांची प्राप्त झालेली प्रकरणावर कार्यवाही करणे.
- चार वर्षातून एकदा रजा प्रवास सवलतीबाबत शासकीय अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये/ तंत्रनिकेतने व तत्सम संस्थातील वर्ग १ अधिकाऱ्यांची प्राप्त झालेली प्रकरणावर कार्यवाही करणे.
- गुणवत्ता दर्जा सुधार योजनेअंतर्गत उच्च शिक्षणासाठी प्रतिनियुक्तीवर पाठविण्याबाबत शासकीय अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये/ तंत्रनिकेतने व तत्सम संस्थातील प्राप्त झालेली वर्ग १ अधिकाऱ्यांची प्रकरणावर कार्यवाही करणे.
- प्रसूती रजेबाबत शासकीय अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये/ तंत्रनिकेतने व तत्सम संस्थातील प्राप्त झालेली वर्ग १ व २ अधिकाऱ्यांची प्रकरणावर कार्यवाही करणे.स्वेच्छा सेवा निवृत्तीबाबतची शासकीय अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये/ तंत्रनिकेतने व तत्सम संस्थातील वर्ग १ व २ अधिकाऱ्यांची प्राप्त झालेली प्रकरणावर कार्यवाही करणे.
- महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ नुसार शासकीय अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये/ तंत्रनिकेतने व तत्सम संस्थातील प्राप्त झालेली प्रकरणे वर्ग १ व २ अधिकाऱ्यांची रजा प्रकरणे हाताळणे
- शासकीय अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये/ तंत्रनिकेतने व तत्सम संस्थातील प्राप्त झालेली प्रकरणे वर्ग १ व २ अधिकाऱ्यांची रजा रोखीकरणाची प्रकरणावर कार्यवाही करणे.
- महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण अटी) १९८१ नुसार आस्थापनाविषयी शासकीय अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये/ तंत्रनिकेतने व तत्सम संस्थातील प्राप्त झालेली वर्ग १ व २ अधिकाऱ्यांची प्रकरणावर कार्यवाही करणे.
- महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी व स्वीयेत्तर सेवा) १९८१ नुसार शासकीय अभियांत्रिकी

/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये/ तंत्रनिकेतने व तत्सम संस्थातील प्राप्त झालेली वर्ग १ व २ अधिकाऱ्यांची पदग्रहण अवधीच्या प्रकरणावर कार्यवाही करणे.

- महाराष्ट्र नागरी सेवा (जेष्ठतेचे विनियमन) नियमावली, १९८२ नुसार जेष्ठतासूच्या तयार करणे चे अनुषंगाने शासकीय अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये/ तंत्रनिकेतने व तत्सम संस्थातील प्राप्त झालेली वर्ग १ व २ अधिकाऱ्यांची प्रकरणावर कार्यवाही करणे.
- २ वर्षासाठी हंगामी पदे भरण्याची कार्यवाही करणे साठी संचालनालयास मदत करणे तसेच त्यांचे मूल्यमापन अहवाला वर दर ३ महिन्यांनी कार्यवाही करणे.
- शासकीय अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये/ तंत्रनिकेतने व तत्सम संस्थातील प्राचार्यांची प्राप्त झालेली सेवानिवृत्ती वेतन प्रकरणे संचालनालयास मंजूरी साठी सादर करणे, तसेच सर्व संस्थाप्रमुखांच्या वेतनवाढी अदा करणे व त्यांची सेवापुस्तके अद्यायावत ठेवणे.
- अतिरिक्त कार्यभाराबाबत विशेष वेतन मंजूरी बाबत शासकीय अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये/ तंत्रनिकेतने व तत्सम संस्थातील मधून प्राप्त झालेली वर्ग १ व २ अधिकाऱ्यांचे प्रकरणावर कार्यवाही करणे.
- पूर्व सेवा जमेस धरणेबाबत तसेच सेवेतील खंड क्षमापित करणेबाबत शासकीय अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये/ तंत्रनिकेतने व तत्सम संस्थातील मधून प्राप्त झालेली वर्ग १ व २ अधिकाऱ्यांच्या प्रकरणावर कार्यवाही करणे.
- शासकीय अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये/ तंत्रनिकेतने व तत्सम संस्थातील मधून प्राप्त झालेली परिविक्षा कालावधीची वर्ग १ अधिकाऱ्याच्यां प्रकरणावर कार्यवाही करणे.
- शासकीय अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये/ तंत्रनिकेतने व तत्सम संस्थातील मधून प्राप्त झालेली संगणक,मराठी व हिंदी भाषेत सूट मिळणेबाबतची प्रकरणे वर्ग १ व २ अधिकाऱ्यांच्या प्रकरणावर कार्यवाही करणे.

**आस्थापना विभाग - २**

**(अशासकीय विषय)**

- अशासकीय अनुदानित संस्थांमधील रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही करणे.
- पदाच्या आढाव्याअंती अशासकीय अनुदानित संस्थांमधील अतिरिक्त ठरलेल्या पदांवरील
- कर्मचा-यांचे समावेशन बाबतची प्रकरणे.
- अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये, तंत्रनिकेतने तसेच इतर तत्सम संस्थांमधील शिक्षकांच्या व ग्रंथपाल यांना वरिष्ठश्रेणी / निवडश्रेणी लागू करण्याबाबतचे शासन निर्णय.
- अशासकीय अनुदानित संस्थांमधील गट-अ, गट-ब आणि गट-क मधील अधिकारी / कर्मचारी यांना

पारपत्रासाठी ना-हरकत प्रमाणपत्र देणे बाबतची कार्यवाही करणे.

- अशासकीय अनुदानित संस्थांमधील अधिकारी / कर्मचारी यांची पूर्वसेवा सेवानिवृ-ती वेतनादी लाभासाठी जमेस धरणे व सेवेतील खंड क्षमापित करणेबाबतची कार्यवाही प्रकरणे.
- अशासकीय अनुदानित संस्थांमधील शिक्षकीय पदाचे परिविक्षा कालावधी पूर्ण करणे बाबतची प्रकरणे.
- .अशासकीय अनुदानित संस्थांमधील गट-क आणि गट-ड मधील कर्मचा-यांना शासन निणर्यानुसार सेवा आश्वासित प्रगती योजना लागू करणेबाबतची कार्यवाही करणे.

**<u>(शासकीय विषय)</u>**

- विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या शासकीय संस्था व कार्यालयातील गट-क आणि गट-ड मधील कर्मचा-यांना शासन निर्णयाच्या आधारे सेवा आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मंजूर करणे.

- अनुकंपा तत्वावर नोकरी मिळणेबाबत प्राप्त झालेलया अर्जांची छाननी करुन शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-अकंपा-१००४/प्र.क्र.५१/२००४/आठ, दिनांक २२ ऑगस्ट २००५ मधील तरतूदीं नुसार कार्यवाही करणे.
- महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील तरतूदीं नुसार वेतन निश्चितीच्या प्रकरणांवर कार्यवाही करणे.
- विधानसभा / विधानपरिषद तारांकित प्रश्नांची माहिती संकलित करुन विहीत नमुन्यात संचालनालयास सादर करणे.
- महाराष्ट्र नागरी सेवा (जेष्ठतेचे विनियमन) नियमावली १९८२ नुसार या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या संस्थांमधील तात्रिक तथा अतांत्रिक कर्मचा-यांची जेष्ठता सूचीबाबत कार्यवाही करणे.

**आस्थापना विभाग - ३**

**आस्थापना विभाग - ३ मधून प्रामुख्याने तृतीय श्रेणीची रिक्त पदे भरणे, पदांच्या आढाव्याअंती अतिरीक्त ठरलेल्या पदांवर कार्यरत कर्मचा-यांचे उपलब्ध रिक्त पदांवर समावेशन करणे, रजा, विशेष रजा मंजूर करणे, बदल्यांबाबतची कार्यवाही, सेवानिवृत्ती प्रकरणे ही कामे शासनाने ठरवून दिलेल्या नियमांनुसार केली जातात.**

- तृतीय श्रेणीची रिक्त पदे भरण्यासाठी पात्र उमेदवारांकडून वर्तमानपत्रामधून जाहिरात देऊन, तसेच संकेत स्थळावर माहिती देऊन, सेवायोजन कार्यालयाकडून यादी मागवून मुलाखतीद्वारे / पदोन्नतीने पात्र उमेदवारांची निवड केली जाते.

- पदांच्या आढाव्याअंती अतिरीक्त ठरलेल्या पदांवर कार्यरत कर्मचा-यांकडून उपलब्ध रिक्त पदांवर समान वेतन श्रेणीत समावेशन करण्यांबाबतचे विकल्प घेऊन त्याप्रमाणे समान पद, त्याच संस्थेत किंवा जवळच्या ठिकाणी सदर कर्मचा-यांचे समावेशन करण्यात आले आहे.

- या विभागांतर्गत तृतीय श्रेणी कर्मचा-यांच्या रजा, विशेष प्रकारच्या रजा महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील तरतूदींनुसार व संबंधित संस्था प्रमुखांनी शिफारस केल्यानुसार मंजूर केल्या जातात.

- या विभागांतर्गत तृतीय श्रेणी कर्मचा-यांच्या बदल्यांबाबतची कार्यवाही शासनाने ठरवून दिल्यानुसार बदलीसाठी अर्ज केलेल्या कर्मचा-यांचे त्यांनी बदली मागितलेले ठिकाण, उपलब्ध जागा, बदलीसाठी नमूद केलेले कारण, तसेच संस्था प्रमुखांची शिफारस इत्यादी विचारात घेऊन एप्रिल किंवा मे महिन्यात केल्या जातात. तसेच विभागीय बदलीचे अर्ज शिफारशींसह मा. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे सादर केले जातात.

- या विभागांतर्गत तृतीय श्रेणी कर्मचा-यांच्या सेवानिवृत्तीची प्रकरणे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (अंशराशीकरण) नियम १९८२ मधील तरतूदींनुसार, तसेच शासनाने ठरवून दिलेल्या नियमांच्या आधारे हाताळली जातात.

| आस्थापना विभाग - ४ |
| --- |
| **आस्थापना विभाग - ४ मधून प्रामुख्याने चतुर्थ श्रेणीची रिक्त पदे भरणे, पदांच्या आढाव्याअंती अतिरीक्त ठरलेल्या पदांवर कार्यरत कर्मचा-यांचे उपलब्ध रिक्त पदांवर समावेशन करणे, रजा, विशेष रजा मंजूर करणे, बदल्यांबाबतची कार्यवाही, सेवानिवृत्ती प्रकरणे ही कामे शासनाने ठरवून दिलेल्या नियमांनुसार केली जातात.** |
| ➢ चतुर्थ श्रेणीची रिक्त पदे भरण्यासाठी पात्र उमेदवारांकडून वर्तमानपत्रामधून जाहिरात देऊन, तसेच संकेत स्थळावर माहिती देऊन, सेवायोजन कार्यालयाकडून यादी मागवून मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड केली जाते.<br><br>➢ पदांच्या आढाव्याअंती अतिरीक्त ठरलेल्या पदांवर कार्यरत कर्मचा-यांकडून उपलब्ध रिक्त पदांवर समान वेतन श्रेणीत समावेशन करण्यांबाबतचे विकल्प घेऊन त्याप्रमाणे समान पद, त्याच संस्थेत किंवा जवळच्या ठिकाणी सदर कर्मचा-यांचे समावेशन करण्यात आले असून, सदरची कार्यवाही अंतिम टप्प्यात आली आहे.<br><br>➢ या विभागांतर्गत चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांच्या रजा, विशेष प्रकारच्या रजा महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील तरतूदींनुसार व संबंधित संस्था प्रमुखांनी शिफारस केल्यानुसार मंजूर केल्या जातात.<br><br>➢ या विभागांतर्गत चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांच्या बदल्यांबाबतची कार्यवाही शासनाने ठरवून दिल्यानुसार बदलीसाठी अर्ज केलेल्या कर्मचा-यांचे त्यांनी बदली मागितलेले ठिकाण, उपलब्ध जागा, बदलीसाठी नमूद केलेले कारण, तसेच संस्था प्रमुखांची शिफारस इत्यादी विचारात घेऊन एप्रिल किंवा मे महिन्यात केल्या जातात.  तसेच विभागीय बदलीचे अर्ज शिफारशींसह मा. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे सादर केले जातात.<br><br>➢ या विभागांतर्गत चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांच्या सेवानिवृत्तीची प्रकरणे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (अंशराशीकरण) नियम १९८२ मधील तरतूदींनुसार, तसेच शासनाने ठरवून दिलेल्या नियमांच्या आधारे हाताळली जातात. |

## लेखा विभाग

हे कार्यालय विभागीय कार्यालय असल्याने तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई कार्यालयाकडून त्या त्या आर्थिक वर्षासाठी अनुदान उपलब्ध करुन दिल्या जाते. त्याचबरोबर संबंधित खर्चासाठी सूचनाही केल्या जातात. तंत्रशिक्षण संचालनालयाकडून :

(१) या कार्यालयासाठी मागणी क्रमांक ३, लेखाशिर्ष २२०३, उपलेखाशिर्ष ००१(०१)(०१) २२०३००२२०४ अन्वये योजनेत्तर खर्चासाठी उपलब्ध करुन देण्यात येते.

(२) या विभागीय कार्यालयातंर्गत असलेल्या पदविका संस्थाना मागणी क्रमाक ३, लेखाशिर्ष २२०३, उपलेखाशिर्ष १०५(००)(०१) २२०३०००२०२ अन्वये योजनेत्तर खर्चासाठी उपलब्ध करुन देण्यात येते.

(३) या विभागीय कार्यालयातंर्गत असलेल्या पदवी संस्थाना मागणी क्रमाक ३, लेखाशिर्ष २२०३, उपलेखाशिर्ष ११२(००)(०१) २२०३०००३२७ अन्वये योजनेत्तर खर्चासाठी उपलब्ध करुन देण्यात येते.

(४) या विभागीय कार्यालयातंर्गत असलेल्या पदविका संस्थाना मागणी क्रमाक ३, लेखाशिर्ष २२०३, उपलेखाशिर्ष १०५(००)(०२) २२०३०००२११ अन्वये योजनातंर्गत खर्चासाठी उपलब्ध करुन देण्यात येते.

(५) या विभागीय कार्यालयातंर्गत असलेल्या पदविका संस्थाना मागणी क्रमाक ७, लेखाशिर्ष २२०३, उपलेखाशिर्ष १०५(००)(०२) २२०३०००४९९ अन्वये योजनातंर्गत खर्चासाठी उपलब्ध करुन देण्यात येते.

(६) या विभागीय कार्यालयातंर्गत असलेल्या पदवी संस्थाना मागणी क्रमाक ३, लेखाशिर्ष २२०३, उपलेखाशिर्ष ११२(००)(०२) २२०३०००३३६ अन्वये योजनातंर्गत खर्चासाठी उपलब्ध करुन देण्यात येते.

वरील अ.क्र. १ चे अनुदान या कार्यालयाच्या योजनेत्तर खर्चासाठी देण्यात येते.

वरील अ.क्र. २ चे अनुदान निर्देश दिल्याप्रमाणे संबंधित पदविका संस्थांना या कार्यालयाकडून वितरित करण्यात येते.

सन २००६-०७ करिता उपलब्ध अनुदानाचे वितरणाचा तक्ता सोबत जोडला आहे.

वरील अ.क्र. ३ ते ६ चे अनुदान तंत्रशिक्षण संचालनालयाकडून परस्पर संबंधित संस्थांना वितरित करण्यात येते.

लेखा विभागाकडून वेतन, प्रवास भत्ता, निवृत्ती वेतन, अंशराशीकरण, सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी, कार्यालयीन खर्च इत्यादि देयके, हे शासन निर्णय तसेच खालील शासनाचे पुस्तकातील नियमानुसार कोषागार कार्यालयाकडून पारित करुन घेतल्या जातात.

तसेच वेळोवेळीच्या शासन निर्णयाप्रमाणे संबंधित प्रकरणी योग्यती कार्यवाही करण्यात येते.

## विद्यार्थी विभाग

विनाअनुदानित पदवी संस्थांतील शाखा बदल तसेच विद्यापिठ अंतर्गत संस्था बदल करण्याबाबतची कार्यवाही

१) विद्यार्थ्याला तो ज्या विद्यापिठात शिकत आहे त्याच विद्यापिठ क्षेत्रातील दूसऱ्या महाविद्यालयात बदल पाहिजे असल्यास त्याने सोबत खालील कागदपत्रे जोडावी .

अ) विद्यार्थी ज्या संस्थेत शिकत आहे त्या संस्थेच्या प्राचार्यांचे बदलीसाठी ना हरकत प्रमाणपत्र
ब) विद्यार्थ्याला ज्या संस्थेत बदली हवी आहे त्या संस्थेच्या प्राचार्याचे संस्थेमध्ये विहित प्रवेश क्षमतेत जागा रिक्त असून विद्यार्थ्याला त्यांच्या संस्थेत प्रवेश देण्यांस ना हरकत प्रमाणपत्र.
क) विद्यार्थी उत्तीर्ण असल्याची गुणपत्रिका
ड) बदली मागण्याचे ठोस कारण
इ) विभागीय कार्यालयाने बदलीस मान्यता दिल्यास त्या बदलीस मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कडून अंतीम मान्यता घेणे आवश्यक आहे .

**विना अनुदानित पदविका संस्थांतील शाखा बदल तसेच संस्था बदल करण्याबाबतची कार्यवाही**

१) विद्यार्थ्याला तो ज्या संस्थेत शिकत आहे त्या संस्थेतून दूसऱ्या संस्थेत संस्थाबदल पाहिजे असल्यास त्या सोबत खालील कागदपत्रे जोडावी .

अ) विद्यार्थी ज्या संस्थेत शिकत आहे त्या संस्थेच्या प्राचार्यांचे बदलीसाठी ना हरकत प्रमाणपत्र
ब) विद्यार्थ्याला ज्या संस्थेत बदली हवी आहे त्या संस्थेच्या प्राचार्याचे संस्थेमध्ये विहित प्रवेश क्षमतेत जागा रिक्त असून विद्यार्थ्याला त्यांच्या संस्थेत प्रवेश देण्यांस ना हरकत प्रमाणपत्र.
क) विद्यार्थी उत्तीर्ण असल्याची गुणपत्रिका/तसेच महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांचे पात्रता प्रमाणपत्र आवश्यक आहे.
ड) बदली मागण्याचे ठोस कारण
इ) विभागीय कार्यालयाने दोन्ही प्राचार्यांचे ना-हरकत प्रमाणपत्र तसेच विद्यार्थ्याची गुणपत्रिका पडताळून बदलीस मान्यता देणे..